
# देगलूर महाविद्यालयात गुणवंतांचा सत्कार



**देगलूर / प्रतिनिधी**

विद्यार्थी जीवनात महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना चांगल्या मित्रांची संगत ठेवा आपल्या व्यक्तिमत्व विकासात नक्कीच सकारात्मक बदल होतात असे प्रतिपादन येथील नगरपालिकेचे मुख्याधिकारी सुंदर बोंदर यांनी केले. देगलूर महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभात ते बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ होते यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेबरेकर, कार्यकारिणी सदस्य देवेंद्र मोतेवार, जनार्दन चिद्रावार, रवींद्र द्याडे यांची उपस्थिती होती बोंदर यांनी मुख्याधिकारी पदापर्यंत आपण कसे पोहोचलो याचा प्रवास विद्यार्थ्यांसमोर उलगडून दाखविला तसेच देगलूर महाविद्यालयाने इयत्ता अकरावी, बारावीच्या वर्गातील मुलांसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू केल्याबद्दल स्वागत करून त्यांनी कौतुक केले.

प्रारंभी प्रास्ताविक उपप्राचार्य प्रा.उत्तमकुमार कांबळे यांनी केले. यावेळी महाराष्ट्रातील ज्येष्ठ साहित्यिक हरी नरके यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यानंतर गुणवंत विद्यार्थी तसेच मैदानी खेळात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र, रोख रक्कम देऊन सन्मान करण्यात आला. अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांनी केला. यावेळी उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, पर्यवेक्षक एस.एन.पाटील, विद्यार्थी ,पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. संतोष वानोळे, प्रा निरज उपलंचवार तर आभार प्रा.आर.व्ही. चिद्रावार यांनी मानले

Scanned with OKEN Scanner